**मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय आवार, फोर्ट, मुंबई– 400 032.**
email: ctcourt-mum@nic.in
**फोन नं. ०२२—२२८४ ४१३४**

# <u>जाहीर सूचना</u>

मा. लेखनसामुग्री समिती, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई, यांचे आदेशानुसार या कार्यालयाच्या आस्थापनेसाठी लेखनसामुग्री अदांजीत वजन ६ टन, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई, येथून मुंबई नगर दिवाणी व सत्र न्यायालय, जुने सचिवालय आवार, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२, येथे आणण्यासाठी एक ट्रक ची आवश्यकता आहे. (लेखनसामुग्रीची चढउतार करासहित) , त्यासाठी संबंधित सेवा पुरवठादाराकडून खुल्या बाजारातून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

तरी स्वारस्य असलेल्या संबंधित सेवा पुरवठादार यांनी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून वाहतूक सेवा प्रक्रियेत भाग घ्यावा:—

| | |
|---|---|
| १. | सेवा पुरवठादाराने पूर्वी शासन स्तरावरच्या अशाप्रकारच्या वाहतूक सेवा प्रक्रियेत सहभाग घेतलेला असावा. |
| २. | दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यामध्ये सादर करावे. |
| ३. | मोहोरबंद लिफाफ्यातील दरपत्रक प्रस्तुत जाहीर सूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत ( दिनांक ०६.०३.२०२५ ते १२.०३.२०२५ ) सार्वजनिक सुटटीवगळता, हमदस्त (By Hand) अथवा टपालाद्वारे (By Post/RPAD/Speed Post etc) प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई—४०० ०३२ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.३० दरम्यान पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उपरोक्त मुदती पश्चात प्राप्त झालल्या मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही |

| | |
|---|---|
| | अथवा अपात्र ठरविण्यात येतील. |
| ४. | मोहोरबंद लिफाफ्यावर **"चर्नी रोड,मुंबई ते नगर दिवाणी व सत्र न्यायालय,मुंबई वाहतुक सेवा दरपत्रक निविदा"** असे स्पष्ट लिहावे. स्पष्ट उल्लेख नसलेले मोहोरबंद लिफाफ्यांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार करण्यात येणार नाही. |
| ५. | उपरोक्त परिच्छेद ३ प्रमाणे विहित मुदतीत प्राप्त झालेले मोहोरबंद लिफाफे दिनांक १३.०३.२०२५ रोजी दुपारी २:१५ वाजता न्यायालय क्र. २२,मा. न्यायाधिशांचे कक्ष दुसरा मजला, जुनी इमारत,नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई—४०० ०३२, येथे उघडण्यात येतील. केवळ पात्र निविदाकारांनी सादर केलेल्या किंमतीचे दरपत्रक विचारात घेण्यात येतील आणि सेवा पुरविण्याचा निर्णय न्युनतम—१ (L-1) च्या आधारे<br>घेण्यात येईल. |
| ६. | मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या दिवशी व वेळी संबंधित सेवा पुरवठादारानी उपस्थित रहावे. जे सेवा पुरवठादार वरील दिवशी व वेळी उपस्थित राहणार नाहीत त्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ७. | सेवा पुरवठादार यांचा दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा—या अन्य व्यक्ती/संस्थेमध्ये थेट स्वारस्य असता कामा नये आणि असे स्वारस्य दिसून आल्यास त्यास 'हितसंबंधाचा संघर्ष' समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील. |
| ८. | सेवा पुरवठादार मोहोरबंद लिफाफ्यासोबत वरील वाहतूक सेवेसाठी स्वारस्य असल्याचे मा. प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई—४०० ०३२ यांचे नावे लेखी पत्र जोडतील, ज्यामध्ये सेवा |

| | |
|---|---|
| | प्रधिका—याबरोबर 'हितसंबंधाचा संघर्ष' नसल्याबाबत आणि एकल निविदा करण्याबाबत हमीपत्र सादर करेल. |
| ९. | कमीत कमी तीन वेगवेगळया सेवा पुरवठादार मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रक प्राप्त न झाल्यास सदर प्रक्रियेला एका आठवडयाची मुदतवाढ देण्यात येईल आणि मुदतवाढीत आवश्यक दरपत्रके प्राप्त न झाल्यास प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविण्यात येईल. |
| १०. | अंतिम निवड झालेला सेवा पुरवठादार आदेशात नमूद वाहतूक सेवा मा. प्रबंधक, नगर दिवाणी न्यायालय, जुने सचिवालय आवार, मुंबई—४०० ०३२ येथे त्यासंबंधीतचा आदेश प्राप्त झाल्यापासून त्वरीत व जाहीर सूचनेतील तपशिलाप्रमाणे सेवा पुरवणेस बंधनकारक असेल. |
| ११. | देयक रक्कम प्रदान करतेवेळी कोणतेही अतिरिक्त शुल्क/विलंब आकार अदा केले जाणार नाही. |
| १२. | वरील प्रक्रियेचे सर्व अधिकार मा. लेखनसामग्री समितीकडे राहतील. |

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०६/०३/२०२५.

सही/—
प्रबंधक
नगर दिवाणी न्यायालय, मुंबई.